**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,**
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ कार्यालय इमारत (दुसरा व चौथा मजला)
सर्व्हे नं ८३२ ए, शिवाजीनगर, पुणे - ४११ ००४.
दुरध्वनी क्र. :- ०२०-२९७०९६१७ वेबसाईट :- mscepune.in ई - मेल :- mscepune@gmail.com

**दरपत्रक सूचना** जाक्र./मरापप/भांडार/द.सू./पडदे खरेदी/2026/ 3474
दिनांक :17/8 /2026

प्रति,

---------------------------------------

---------------------------------------

**विषय :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या पुणे - 04 या कार्यालयाच्या दुसरा व चौथा मजला विविध शाखा व विभाग यांना खिडकी,दरवाजा व पॅसेज परिसरात लावणेसाठी पडदे खरेदी करणेबाबत..

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या पुणे - 04 या कार्यालयाच्या दुसरा व चौथा मजला विविध शाखा व विभाग यांना खिडकी, दरवाजा व पॅसेज परिसरात पडदे लावणेसाठी संस्थांकडून दरपत्रके मागविण्यात येत आहे. सदर कामाची चौकशी भांडार शाखेत करावी. खिडकी, दरवाजे व मोकळे पॅसेज जेथे पडदा लावणे आवश्यक आहे तेथील योग्य ते एकक वापरुन तयार होणार मोजमापे भांडार शाखेत लेखी अवगत करणे आवश्यक राहील. सदर साहित्य किंवा पडदे स्थापना करतेवेळी लागणारे मनुष्यबळ किंवा इतर आवश्यक साहित्य पुरवठा करणे संबंधित संस्थेची जबाबदारी असेल.

तांत्रिक कागदपत्रे -

| अ.क्र. | कागदपत्रे तपशील |
|---|---|
| 1. | सक्षम प्राधिकारांनी दिलेला नोंदणीबाबतचा परवाना. (शॉपॲक्ट् परवाना.) |
| 2. | GST प्रमाणपत्र. |
| 3. | संस्था चालकाचे आधार व पॅन. |

वित्तीय लखोटा

| अ.क्र. | तपशील | दर जीएसटी व इतर कर वगळून |
|---|---|---|
| 1. | आवश्यकतेनुसार खिडकी/दरवाजा/मोकळा पॅसेज पडदा चांगल्या प्रतीचा दर प्रति Sq. foot. | |
| 2 | आवश्यकतेनुसार खिडकी/दरवाजा/मोकळा पॅसेज साधारण प्रतीचा पडदा दर प्रति Sq. foot. | |
| 3 | सर्व साहित्य क्लिप, सर्व खर्च व स्थापनेसह(साहित्य व मजूरीसह ). | |
| 4 | बार चे (Running) Foot चे दर. | |

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या स्थलांतरित कार्यालयात विविध शाखा व विभाग यांना पडदे पुरवणेसाठी दिनांक :17 /08/2026 ते दिनांक :21 /08/2026 दुपारी 3.00 वाजेपर्यंत दरपत्रके स्विकारण्यात येतील. तांत्रिक कागदपत्रे व दरपत्रके एकाच बंद पाकिटामध्ये " आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे - 04" यांचे नावे हस्तपोच द्यावीत. बंद पाकिटावरील भागावर **पडदे पुरवणे संबंधी दरपत्रक"** असा स्पष्ट उल्लेख करावा. दरपत्रक वस्तु व WithOut GST सह सादर करावे, तथापि GST नोंदणी प्रमाणपत्र नसल्यास तसे संस्थेच्या लेटरहेडवर सादर करावे. सदर कामासंदर्भात कोणतेही आगाऊ रक्कम(Advance) अदा केली जाणार नाही. आपण सादर केलेला दर हा सर्व खर्च(वाहतूक, मजूरी व इतर सर्व खर्च ) समावेशक असावा.
उशिरा आलेली किंवा ई-मेलवर पाठविण्यात आलेली दरपत्रके स्विकारण्यात येणार नाहीत, दरपत्रके उघडणे अथवा रद्द करणेचे अधिकार मा. अध्यक्ष यांचे राहतील.

**अटी व शर्ती :**

1. सहभागी संस्थेने संस्था नोंदणीकृत सक्षम प्राधिकारी यांचे प्रमाणपत्र/लायसन्स प्रोपरायटर यांचे आधार व पॅन यांच्या स्व छायांकित प्रती दरपत्रकासोबत सादर कराव्यात.
2. परिषदेतील शाखेच्या/विभागाच्या मागणी आदेशानुसार आपणास काम पूर्ण करावे लागेल.
3. आपत्कालीन व्यवस्थेत सेवा पुरवणे शक्य नसल्यास पर्यायी व्यवस्था करावी, तसे परिषदेस लेखी स्वरुपात कळविणे आवश्यक आहे.पर्यायी व्यवस्था केलेल्या संस्थेस देय रक्कम आपणास दयावी लागेल. परीक्षा परिषद देयक देण्यास जबाबदार राहणार नाही.

4. परिषदेसाठी वेळेत सेवा उपलब्ध न झाल्यास दंड आकारण्यात येईल.
5. पडदे पुरवठा करणेसंबंधी (कुशल तांत्रिक) सेवा, वस्तुसह पुरविणे संस्थेस बंधनकारक राहील, दरपत्रके मागविलेल्या व प्राप्त होणाऱ्या सबबीवर परिषद अभिप्राय देण्यास बांधिल राहणार नाही.
6. न्युनत्तम दर असणारी संस्था सेवा देण्यास नियुक्त झाल्यास व काम पुर्ण झाल्यानंतर देयक सादर करावे, नियमाप्रमाणे देयक अदागईची कार्यवाही करण्यात येईल.
7. परिषदेच्या मागणीनुसार सेवा पुरवठा केल्यानंतर देयकाची पडताळणी करुन देयक अदा करण्यात येईल.
8. दरपत्रके मागविणे अथवा प्राप्त दरपत्रके रद्द करणेचा अधिकार परीक्षा परिषदेचा राहील.

(अनुराधा ओक)
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे-04